**मे. गुजरात अंबुजा एक्सपोर्टस लिमिटेड, प्लॉट क्र. ए-४, ए-४/१, एमआयडीसी, चाळीसगाव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांच्या प्रस्तावित एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल व इथेनॉल - १२० किलो लिटर प्रति दिवस क्षमता, मका स्टार्च वर आधारित डिस्टिलरी प्रकल्प आणि ४ मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्प (अंतर्गत वापरासाठी) या उद्योगाची दि. २१/०५/२०२१ रोजी झालेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचे इतिवृत्त**

---

मे. गुजरात अंबुजा एक्सपोर्टस लिमिटेड, प्लॉट क्र. ए-४, ए-४/१, एमआयडीसी, चाळीसगाव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव यांच्या प्रस्तावित एक्स्ट्रा न्युट्रल अल्कोहोल व इथेनॉल - १२० किलो लिटर प्रति दिवस क्षमता, मका स्टार्च वर आधारित डिस्टिलरी प्रकल्प आणि ४ मेगावॅट औष्णिक विद्युत प्रकल्प (अंतर्गत वापरासाठी) या उद्योगाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दि. २१/०५/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव येथून व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारे घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्र. BO/JD (WPC)/PH/B-२१०५१०-FTS-००४७ दि. १०/०५/२०२१ अन्वये सदरच्या लोकसुनावणीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हादंडाधिकारी, जळगांव<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - अध्यक्ष |
| २) | प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक | - सदस्य |
| ३) | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव | - समन्वयक |

सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठी खालील समिती सदस्य उपस्थित होते.

१) मा. अभिजित राऊत, भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, जळगांव

२) डॉ. प्रविण जोशी,
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक

३) श्री. सो. म. कुरमुडे
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सदरच्या पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समितीचे अध्यक्ष व सदस्य तसेच महसूल विभागाचे अधिकारी व जळगांव जिल्हयातील व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे उपस्थित नागरिकांचे स्वागत केले. तसेच समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सुरु करण्यात आली.

सर्वप्रथम समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी सुचित केले की, भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दि.१४/०९/२००६ व सुधारीत दि.०१/१२/२००९ रोजीच्या अधिसुचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरण विषयक संमती घेणे बंधनकारक असून त्यापूर्वी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून दि. ०७/०२/२०२० रोजी सदरच्या प्रस्तावित प्रकल्पाकरिता प्रकल्पाधारकास टर्म्स ऑफ रेफरन्स (T.O.R.) प्राप्त झालेला असून प्रकल्पाधारकाने दि.०८/०४/२०२१ रोजी रितसर शुल्क भरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज केला होता.

समन्वयक यांनी नमूद केले की, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीचा मुळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणाऱ्या परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पास बंधनकारक असणाऱ्या प्रदूषण नियंत्रण संयत्रणा व त्या अनुषंगाने कायदे याबाबतची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणे.

मप्रनि मंडळाकडे प्राप्त लोकसुनावणी घेण्याबाबतच्या अर्जाच्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या परवानगीने दि.२१/०५/२०२१ रोजी सकाळी ११:०० वाजता मे. गुजरात अंबुजा एक्सपोर्टस लिमिटेड या उद्योगाची पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत दिनांक निश्चित करण्यात आली होती. याबाबत नियमाप्रमाणे ३० दिवस अगोदर दि.१५/०४/२०२१ रोजीच्या मराठी दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक द टाइम्स ऑफ इंडिया मध्ये सदरच्या लोकसुनावणीबाबत सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच प्रकल्पाधारकाने प्रस्तावित प्रकल्पाच्या सादर केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल / पर्यावरण व्यवस्थापन योजना व कार्यकारी सारांश (मराठी व इंग्रजी) यांच्या प्रती खालील शासकीय कार्यालय तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर इच्छिुक नागरिकांना अभ्यास करण्याकरीता ठेवण्यात आल्या होत्या.

१) जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.
२) जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.
३) जिल्हा परिषद कार्यालय, जळगांव.
४) तहसिल कार्यालय, चाळीसगांव.
५) उप-विभागीय कार्यालय, चाळीसगांव.
६) ग्रामपंचायत कार्यालय, खडकी (बु.), ता. चाळीसगांव, जि. जळगांव.
७) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जळगांव, हॉल ए, तिसरा मजला, जुने बी. जे. मार्केट,जळगांव – ४२५००१.
८) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला मजला, त्रबंक रोड, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-४२२००७.
९) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, ३ रा मजला, सायन (पूर्व), मुंबई-४०००२२.
१०) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, १५ मजला, मादाम कामा रोड, मुंबई.
११) पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, तळ मजला, इस्ट विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाइन्स, नागपूर-४४०००१.

सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत श्री. निलेश देशमुख, प्रकल्प प्रवर्तक यांनी सविस्तर अहवाल सादर केला. तसेच सदरील प्रस्तावित प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण करतांना घेण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत माहिती दिली.

सादरीकरणांनतर समन्वयक यांनी लोकसुनावणीसाठी उपस्थित नागरिकांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे या प्रस्तावित प्रकल्पाबाबत त्यांचे मत, टिका-टिप्पणी, आक्षेप, सुचना मांडण्याबाबत आवाहन केले. तसेच त्यांनी सांगितले कि मा. श्री. मंगेश चव्हाण सो, आमदार, चाळीसगांव यांचे पत्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे ईमेलव्दारे दि.१९/०५/२०२१ रोजी प्राप्त झालेले असून याबाबतची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच पत्रामध्ये नमूद केलेल्या मुद्दयांबाबत समितीपुढे वाचून दाखविले. मुख्यत: पत्रामध्ये नमूद केलेला मुद्दा – कोरोना काळामध्ये ऑनलाईन लोकसुनावणी घेणे हे अन्यायकारक असून सदरची लोकसुनावणी नियमानुसार कोरोनाचा लॉकडाऊन उठल्यानंतर प्रत्यक्ष जनतेत घेण्यात यावी, असे सुचित केलेले आहे. तसेच सद्या अस्तित्वात असलेल्या मे. गुजरात अंबुजा एक्सपोर्ट कंपनीच्या उत्पादन प्रक्रियेतून निघणाऱ्या दुर्गंधीयुक्त वासामुळे चाळीसगांव शहरासह परिसरातील अनेक गावांच्या जनतेचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच आजूबाजूच्या शेतजमीनी नापीक झालेल्या आहेत व विहिरींचे पाणी सुध्दा प्रदूषित झालेले आहे, याबाबत खडकी बु. गावातील ग्रामपंचायत विविध सामाजिक राजकीय संघटना यांच्या कंपनीबाबत वेळोवेळी तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तरी लोकप्रतिनिधी या नात्याने वरील सर्व बाबींचा विचार करता सदर ऑनलाईन लोकसुनावणी घेणे संयुक्तीक ठरणारे नसून जनतेवर अन्यायकारक आहे. तरी सदरची लोकसुनावणी स्थगित करुन ही कोरोना प्रादूर्भाव कमी झाल्यावर घेण्यात यावी, असे सुचविलेले आहे.

तरी उपस्थितांनी नोंदविलेली मते व त्याबाबतचा अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व नोंदविलेले मत | अभिप्राय |
|---|---|---|
| १ | **श्री. किरण देसले, चाळीसगांव** – सदरील प्रस्तावित प्रकल्पामध्ये घरगुती सांडपाण्याचे कसे नियोजन आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - सदरील प्रस्तावित प्रकल्पामध्ये ४५ केएलपीडी इतक्या क्षमतेचा घरगुती सांडपाणी नियंत्रण संयंत्रणा उभारणार येईल. |
| २ | **श्री. नितीन जैन, चाळीसगांव** – प्रस्तावित प्रकल्पामधील वायु उत्सर्जनावर काय नियोजन केले आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - सदरचा प्रस्तावित प्रकल्प हा खाद्य प्रक्रिया कंपनीत मोडत असून त्याच्या मध्ये किनवन, डिस्टीलेशन ही प्रक्रिया राहणार असून प्रक्रियेतून कार्बन डॉक्साईड हा मुख्य वायु उत्सर्जित होणार आहे. तरी सदरचा वायु हा हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा स्क्रबर व्दारे स्क्रब करुन हवेत सोडला जाईल. कार्बन डॉक्साईड वायु हा प्रदूषणकारी नसून तो उपयोग करण्यायोग्य आहे. |
| ३ | **श्री. जगदिश सुर्यवंशी, चाळीसगांव** – विद्यमान प्रकल्पातील राखेच नियोजन व्यवस्थित नसून सदरची राख ही कंपनीच्या ४ ते ५ किमी अंतरावर आजूबाजूच्या परिसरात उडत असते. तसेच ईटीपी व्यवस्थीतरित्या चालवित नसून ईटीपीचे सांडपाणी खडकी गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीकडे सोडण्यात येत असते. विद्यमान प्रकल्पामध्ये व्यवस्थित नियोजन नसल्यास सदरच्या प्रकल्पामध्ये विस्तार का करत आहे ? | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - विद्यमान प्रकल्पामधून निर्माण होणारी राख ही स्थानिक विटभट्टीधारकांना व सिमेंट उद्योगांना पूर्णपणे विकली जाते. तसेच जलप्रदूषण नियत्रंण सयंत्रणेमध्ये सांडपाण्याची पुर्णपणे प्रक्रिया केली जाते. ज्या ज्या वेळी तक्रारी आलेल्या आहेत त्यात्यावेळी तक्रारीचे निराकरण केलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | विद्यमान प्रकल्पामध्ये एकही स्थानिक कामगार नसून बाहेरील जवळपास ५०० कामगार आहेत. स्थानिक लोकांना रोजगार दिला जात नाही. आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या विहिरीतील पाणी हे लाल झालेले आहे. त्यांच्या शेतात राख उडलेली असून त्यांचा विचार कंपनी करीत नाही. आहे त्या प्रकल्पाचे व्यवस्थीत नियोजन करा, प्रकल्पाचे विस्तारीकरण करु नका, हि विनंती. | |
| ४ | **श्री. भूषण पाटील, चाळीसगांव** – सदरच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी झूम ॲपव्दारे लोकसुनावणीची मिंटीग घेण्यात येत आहे. परंतु ग्रामीण भागातील किती लोकांना झूम ॲप व त्याच्या पासवर्डबद्दल कळत ? तरी सर्व सामान्य जनतेला कळेल अशी लोकसुनावणी घेतली पाहिजे होती. तसेच आपण सदरची सुनावणी ही टाईम्स ऑफ इंडिया या पेपरमध्ये जाहीरात प्रकाशीत केलेली होती, परंतु किती ग्रामीण भागातील लोक हे टाईम्स ऑफ इंडिया हा पेपर वाचतात. कोरोनाच्या प्रादुभार्वामुळे नागरिक वृत्तपत्र घेतही नाही. तसेच तहसिल कार्यालयात प्रकल्पाचे दस्ताऐवज अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते, परंतु कोरोनाच्या काळात किती नागरीक तहसिल कार्यालयात दस्ताऐवज पाहण्यासाठी गेली होती. सदरच्या लोकसुनावणीसाठी जाणूनबूजून नियम डावलण्यात आलेले आहेत. ऑनलाईन सुनावणीला विरोध नाही. परंतु सुरुवातीपासूनच जी कंपनी वादग्रस्त ठरलेली असून दुर्गंधीयुक्त आहे. त्या कंपनीबद्दल सर्वसामान्य नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेण्यासाठी जागा व वेळ दिली पाहिजे होती. लोकांवर हा मोठा अन्याय झालेला आहे. सांडपाणी, हवा व इतर व्यवस्थापनाबाबत कंपनीव्दारे नियोजन व उपाययोजना तांत्रिकदृष्टया व्यवस्थितरित्या कंपनीव्दारे सांगण्यात येत असून ते किती नागरीकांना कळत आहे. खडकी व आसपासच्या गावातील किती लोक सुनावणीसाठी झूम ॲपवर उपस्थित झालेले आहे. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | सदरील प्रकल्पाची लोकसुनावणी रद्द करुन २००६ च्या अधिसुचनेनुसार घेण्यात यावी. झूम ॲपव्दारे प्रस्तावित प्रकल्पासाठी लोकसुनावणी घेणे योग्य नाही. कोवीड-१९ च्या प्रादुभार्वाच्या काळात लोकसुनावणी घेण्याच्या मार्गदर्शक तत्वे केंद्राने प्रारीत केलेल्या आहेत. सुरक्षित अंतर ठेवून १०० लोकांपर्यत लोकसुनावणी प्रत्यक्ष स्थळावर घेण्यात यावी. तसेच आसपासच्या ज्या लोकांना खरोखरच त्रास होत आहे, ते खरेच झूम मिंटिगमध्ये उपस्थित आहेत का ? तर त्यांचा अधिकार डावलले जात आहे. जर मा. आमदार साहेबांनी व्हॉटअॅपवर पोस्ट टाकली नसती तर चाळीसगांव व आसपासच्या नागरिकांना लोकसुनावणीबाबत काहीही कळले नसते. लोकांना अंधारात ठेवून कंपनी हवा, पाणी खराब करुन पैसा कमवित आहे. खडकी व चाळीसगांवच्या नागरिकांना स्वच्छ हवा, पाणी व जीवन जगण्याचा अधिकार मिळत नसेल, ऐवढे त्रास सहन करुन सुध्दा खडकी गावातील फक्त १० लोकांना रोजगार मिळत असेल, तर मग या लोकसुनावणीचा फायदा काय ? तरी लोकांचे मते, विचारलेले प्रश्न, मांडलेले मुद्दे यांची नोंद घेऊन याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात यावा. तरी मा. जिल्हाधिकारी साहेब, जोशीसाहेब व कुरमुडे साहेब यांना विनंती करण्यात येते की, सदरची लोकसुनावणी ही रद्द करुन खडकी गावातच घेण्यात यावी, हि विनंती. | |
| ५ | **श्री.. रंगनाथ सावंत, खडकी** - कंपनीच्या आजूबाजूच्या शेतातील जमीन व विहीरीचे पाणी खराब झाले आहे. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |
| ६ | **अँड धनंजय ठोके, चाळीसगांव** – स्थानिक लोकांनी सदरच्या सुनावणीबाबत अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. तसेच स्थानिक आमदार साहेबांनी सुनावणी घेऊ नका व ती रद्द करा, असे पत्र दिले आहे. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |
| ७ | **अँड. धनंजय ठोके, चाळीसगांव** - जर सदरचा प्रकल्प हा ग्रीन फील्ड आहे की झेडएलडी च्या प्रकारातील आहे ? सदरचा प्रकल्प हा झेडएलडीचा आहे तर कश्याच्या आधारावरुन सांगता ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - सदरील प्रस्तावित आसवनी प्रकल्प हा झेडएलडीच्या प्रकारातील आहे. जर भारतामध्ये कुठेही आसवनी उभारायचा असेल तर त्याबाबतचा संपूर्ण अहवाल हा केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला द्यावा लागतो. त्यानंतर तंज्ञ समितीकडे डीपीआर सुनावणीसाठी जातो. |

| | | |
|---|---|---|
| | | त्यानंतर प्रत्येक आसवानी प्रकल्प हा झेडएलडी या तंत्रज्ञावर कार्यान्वीत करण्यात यावा, याबाबत टर्म्स ऑफ रेफरन्र्स प्रदान करण्यात येतो. |
| ८ | **ॲड. धनंजय ठोके, चाळीसगांव** – जर झेडएलडी आहे तर एमईई, प्राथमिक प्रक्रियेमध्ये स्पेंटवॉशचा घनफळ कमी करण्यासाठी काय उपाययोजना आहेत ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - सदरचा आसवनी प्रकल्प हा मोलॉसिसवर आधारीत नसून फक्त मळी / मोलॉसिसवर आधारीत साखर कारखान्यात स्पेंटवॉश तयार होत असतो. सदरचा प्रकल्प हा धान्यावर आधारित असून प्रि-प्रक्रिया करुन ड्राय मिलींगमध्ये पावडर तयार केली जाते. पावडरनंतर जो काही स्टार्च तयार होईल त्या स्टार्चमधील ग्लुकोज व फ्रक्टोज डीस्टीलेशनव्दारे काढून त्याची इथेनॉल निर्मिती केली जाईल. त्यामुळे या प्रकल्पामध्ये कुठेही स्पेंटवॉश तयार होत नाही. तसेच मोलॉसिसवर आधारीत आसवानी मध्ये स्पेंटवॉश साठवण्याकरीता लगून्स असतात. परंतु या प्रकल्पामध्ये कुठेही तसे नियोजन नाही. डिस्टीलेशन केल्यानंतर जे काही कंन्डेसेंट निघेल त्यावर सीपीयु मध्ये प्रक्रिया करुन १०० टक्के पुर्नवापर होईल. इथेनॉल तयार झाल्यानंतर ड्राय ॲण्ड वेट ग्रन्युअल तयार होईल. त्यांचा स्थानिक पातळीवर कॅटल / पोल्ट्री फीड म्हणून वापर करण्यात येईल. |
| ९ | **श्री. किसनराव जुर्वेकर, चाळीसगांव** - विद्यमान प्रकल्पामधून मक्यावर प्रक्रिया होत असतांना त्याचा वास येतो. त्यामुळे खडकी व परिसरातल्या लोकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे. जमिनीचा पोत खराब झालेला आहे. तसेच स्थानिक शेतकऱ्यांच्या एमआयडीसीमध्ये जमिनी गेलेल्या असून अद्यापर्यंत त्यांना उद्योगधंद्यामध्ये रोजगार मिळालेला नाही. या दृष्टीकोनातून आपली नेमकी भूमिका काय आहे. | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - स्थानिक कुशल व अकुशल कामगारांना प्राधान्य दिले आहेत व यापुढेही देणार आहोत. तसेच प्रस्तावित प्रकल्पामध्ये ६० टक्के हे स्थानिक लोकांना रोजगार दिले जाईल, असे आश्वासन दिले. |
| १० | **श्री. किसनराव जुर्वेकर, चाळीसगांव** - पाण्याचे प्रदूषण व जमीनीची पोत खराब झाली आहे, याबाबत आपली भूमिका काय आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रस्तावित प्रकल्पामधून सांडपाण्याच्या ४० ते ६० टक्के पाण्याचे पुर्नवापर केले जाईल व उर्वरीत पाणी हे एमईईमध्ये ईव्हऑपरेट करुन फक्त स्लरीयुक्त स्लज हा खत म्हणून वापर करण्यात येईल. |
| ११ | **श्री. वाल्मिक महाले, कुंजर** - प्रकल्पामध्ये प्रत्येक गोष्टीचे नियंत्रण ठेवण्यात आले आहे. जसे पर्यावरण, व्यवस्थापन त्याप्रमाणे कामगारांचेसुध्दा नियंत्रण असले पाहिजे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - १०० ते १५० कुशल कामगार लागणार आहे. तर ६० टक्के हे स्थानिक लोकांनाच रोजगार देणार आहे, असे आश्वासन दिले. |

| | | |
|---|---|---|
| | ८० ते ९० टक्के कामगार हे स्थानिक पातळीवरच शिक्षणाच्या अटी व शर्तीनुसार घेतले जावे, याबाबत भुमिका काय असेल. | |
| १२ | **श्री. संतोष कोठारी, चाळीसगांव** - बॉयलरला ऑनलाईन मॉनिटरींग प्रणाली बसविली आहे का ? | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - विद्यमान प्रकल्पामध्ये बॉलयरला इलेक्ट्रोस्टेस्टीक प्रेसीप्रेटर (ईएसपी) ही हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात आलेली आहे. तसेच OCMS सुध्दा बसविले असून CPCB व MPCB सर्व्हरला जोडण्यात आलेले आहे. |
| १३ | **श्री. रुपेश भावसार, चाळीसगांव** - बॉयलरला जो ईएसपी बसविला आहे तो रात्रीच्यावेळी बंद करुन ठेवतात. | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - ईएसपी हा नियमित चालू असतो. |
| १४ | **श्री. मोहित भोसले, चाळीसगांव** - सदरच्या प्रकल्पाने शासनाच्या अटी व शर्तीचे पालन केले पाहिजे. स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन द्यावी, ही मागणी आहे. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |
| १५ | **श्री. नितीन चौधरी, चाळीसगांव** - सांडपाण्याचे व्यवस्थापन कोणत्या व कश्या पध्दतीने करणार आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रस्तावित प्रकल्पासाठी एकूण ५४० सीएमडी इतके पाणी लागणार असून त्यापैकी ६० टक्के प्रक्रियेकृत आरओचे पाणी हे प्रकल्पाच्या प्रक्रियेमध्ये व प्लोअर वॉशींग साठी पुर्नवापर करणार आहे. सदरचा प्रकल्प हा झेडएलडी या तंत्रज्ञानावर आधारीत आहे. |
| १६ | **श्री. नितीन सोनवणे, चाळीसगांव** - बॉयलरमधून निघणाऱ्या प्रदूषित घटकांचे मर्यादा किती असणार आहे व हवा प्रदूषण नियंत्रणेसाठी काय बसविणार आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - हवेतील वातावरणाच्या घटकाचे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानंकेनुसार PM 2.5 व PM 10 तर चिमणीच्या धुराचे TPM व SO2 हे विहीत मर्यादेच्या आतच राहतील. बॉलयरला इलेक्ट्रोस्टेस्टीक प्रेसीप्रेटर ही हवा प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा बसविण्यात येईल. |
| १७ | **श्री. लक्ष्मण शिरसाठ, चाळीसगांव** - स्थानिक लोकांच्या भरपूर समस्या आहेत. चाळीसगांवमध्ये उद्योगांचे येणे खूप गरजेचे आहे. बेलगंगा, दूध डेअऱ्या बंद पडल्या आहेत. सदरच्या प्रकल्पामध्ये विस्तार करत असाल तर पर्यावरणाचे संतोलन राखून प्रकल्प उभारावे. प्रकल्पधारकाव्दारे पर्यावरणाची काळजी घेण्यात येत असून हरीतपट्टा सुध्दा तयार करीत आहे. जर सदरचा प्रकल्प हा पर्यावरणाचे संतूलन राखून काम करत असेल तर आम्ही उद्योगाच्या पाठीशी आहोत. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | सदरचा प्रकल्प सुरु झाला तर स्थानिक शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळेल, दळणवळण वाढेल तसेच गुजरात अंबुजा यांच्या मदतीने चाळीसगांवच्या ट्रामा सेंटरमध्ये ऑक्सीजन निर्मिती प्लांन्ट लावले जात असून ते सामाजिक बांधिलकी जपत आहे. तसेच स्थानिक लोकांना जास्त प्रमाणात रोजगार देण्यात यावा. खडकी व चाळीसगांवच्या बेरोजगारांना प्राधान्य द्यावे. ८० टक्के स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे, असे प्रकल्पाला व शासनाला विनंती करतो. | |
| १८ | **श्री. राहुल पाटील, चाळीसगांव** - नवीन प्रकल्प येत आहे, परंतु विद्यमान प्रकल्पामुळे खडकी व चाळीसगांवच्या नागरिकांना दुर्गंधीचा खूप त्रास होत आहे. झूम ॲपव्दारे सुनावणी घेणे चुकीचे आहे. आता खडकी गावाचे फक्त १० ते १२ जण उपस्थित असून ते अन्यायकारक आहे. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |
| १९ | **श्री. प्रविण मराठे, चाळीसगांव** - दुर्गंधीचा खूप त्रास होतो. खूप घाण वास येतो. लोकांच्या आरोग्याशी भावनेशी खेळण्याचा कार्यक्रम बंद केला पाहिजे. उपस्थित लोकांना तांत्रिक भाषा कळत नाही. आतापर्यंत स्थानिक लोकांना किती रोजगार दिला आहे ते सांगणे आवश्यक आहे. सुनावणी रद्द झाली पाहिजे, हि विनंती. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |
| २० | **श्री. भूषण खलाणे, चाळीसगांव** – विद्यमान प्रकल्पाने रितसर अप्रेटिंशिप रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. २-३ वर्षापासून कंपनीने रजिस्ट्रेशन केलेले नाही. औद्योगिक सुरक्षा विभागाला जवळपास २५० कामगार दाखविलेले आहे. | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - विद्यमान प्रकल्पाने ट्रेनिंग व अप्रेटिंशिप साठी केंद्र सरकारच्या एनएपीएस (नॅशनल अप्रेटिंशिप प्रमोशन स्किम) रजिस्ट्रेशन घेतले आहे. |
| २१ | **श्री. प्रशांत राजपूत, खडकी** - प्रकल्पाच्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांच्या विहिरींच्या पाण्याचा टीडीएस कधी तपासलेला असून वायू प्रदूषण कोणत्या वेळेला तपासलेले आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - १ नोव्हेंबर २०१९ ते जानेवारी २०२१ पर्यंत या तीन महिन्याच्या कालावधी मध्ये सर्व्हे करण्यात आलेला आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शका प्रमाणे हवेचा पीएम २.५ व पीएम १० या मानकांचे वातावरणातील हवेची गुणवत्ता ही ८ ठिकाणी अप व डाऊन स्ट्रीमला करण्यात आलेली आहे. |
| २२ | **श्री. राहुल पाटील, चाळीसगांव** - आपण तांत्रिक दृष्टया बरोबर असाल परंतु स्थानिक लोकांना / शेतकऱ्यांना काय त्रास होत आहे, पाण्याचे काय प्रश्न आहे. त्याच्यावर काय नियोजन केले आहे. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | झूम ॲपव्दारे सुनावणी घेणे चुकीचे असून ती रद्द करावी. तसेच आमदार साहेबांनी, सामाजिक संघटना यांनी सुध्दा विरोध केला आहे. स्थानिक प्रतिनिधीशी चर्चा करुन निर्णय घ्यावा, हि विनंती. | |
| २३ | **श्री. मांडोळे, खडकी ग्रामपंचायत कार्यालय** - मौजे खडकी गावाचे सरपंच, उपसरपंच व इतर ग्रामस्थ सदरच्या प्रकल्पाच्या सुनावणीकरीता ग्रामपंचायत कार्यालय येथे उपस्थित आहेत. कोरोना काळानंतर सदरील प्रकल्पाची सुनावणी घेतली असती तर योग्य राहीले असते. तरी आम्ही संपूर्ण गावाच्यावतीने काही मुद्दे आहेत ते मांडत आहे. खडकी गावातील लोकांच्या आरोग्यावर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये. जल, हवा प्रदूषीत होऊ नये. शेतकऱ्यांच्या जमीनी खराब होऊ नये. पिण्याचे पाणी प्रदूषित होऊ नये. स्थानिक लोकांचा बेरोजगारीचा प्रश्न आहे. या मुद्दयांसहित आपणाकडे पाठपुरावा व पत्रव्यवहार केला होता. ग्रामपंचायत समितीने सुध्दा प्रकल्प व्यवस्थापक यांच्याशी भेट घेतली होती. तसेच अगोदरच्या प्रकल्पावेळी सुध्दा आपण खडकी वाशीयांना प्रकल्पामुळे कोणताही त्रास होणार नाही असे सांगितले होते, आतापण तेच सांगत आहात. नागरिकांनी मांडलेल्या मुद्दयांचासुध्दा विचार करावा. खडकी गावातील तरुण बेरोजगारांचा प्रश्न निकाली काढावा. तसेच औद्योगिक विकास महामंडळाने कवडी मोलाच्या भावाने शेतकऱ्यांची जमीन घेतलेली आहे. न्यायालयीन प्रकरण चालू आहे. त्यांच्या घरातील लोकांना कोणताही रोजगार मिळवून दिलेला नाही. येणाऱ्या उद्योगामुळे खडकी गावातील पिण्याचे पाणी, हवा दूषित होऊन शेतकऱ्यांची जमीन खराब होईल. तरी मा. जिल्हाधिकारी यांना विनंती करतो की, सदरील बाबींचा गांर्भीयाने लक्ष घालून लेखी आश्वासन द्यावे. खडकी गाव हया प्रकल्पामुळे उदध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. मा. आमदार साहेबांच्या पत्रव्यवहाराचा सुध्दा विचार करावा, हि विनंती. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| २४ | **ॲड. ठोके, चाळीसगांव** – व्दितीय स्वरुपाच्या सांडपाणी प्रक्रिया प्रणालीची व प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचे काय नियोजन आहे. फुगिटिव्ह इमीशनचे काय नियोजन आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रस्तावित प्रकल्पामध्ये प्राथमिक, व्दितीय व तृतीय स्वरुपाची जल प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा तसेच आरओ व एमईई उभारण्यात येणार आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा १०० टक्के वापर हा प्रकल्पाच्या हरितपट्टा विकासासाठी / सिंचनासाठी केला जाईल.<br>फुगिटिव्ह इमीशन हे मालाची वाहतूक करतांना होत असते. खराब व कमकुवत रस्त्यामुळे धुळ उडते. राख व कोळसा साठवण्याच्या ठिकाणी फुगिटिव्ह ईमीशन निर्माण होते. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार रस्ते वाहतूक केली जाईल. तसेच राख साठवणूकीच्या ठिकाणी पाणी फवारणी यंत्रणेची व्यवस्था करण्यात येईल. तसेच राख ही सायलो मध्ये साठवण्यात येऊन ती बंदिस्तयुक्त ट्रकव्दारे देण्यात येईल. |
| २५ | **ॲड ठोके** - प्रोटोकॉल प्रमाणे कामाचे दिवस हे जास्तीत जास्त ३०० दिवस असावेत पण आपल्याकडे ते ३३० दिवस आहेत, हे कायद्याचे उल्लघंन आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - एमईई, आरओ व ईएसपी ही प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा करोडो रुपयांची असते. त्याला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वेनुसार ३३० दिवसांची मान्यता मिळते, त्यानुसार घेण्यात आलेले आहे. |
| २६ | **श्री. किसनराव जुर्वेकर** – वाढीव प्रकल्पासाठी पाण्याचे स्त्रोत काय आहे. एमआयडीसी गिरणा नदीच्या जामदा धरणातून पाणी देणार आहे. परंतु सदरच्या धरणातून गावांसाठी पाणीपुरवठा योजना कार्यान्वित आहे. त्यामुळे सदरच्या योजना बाधित होणार नाही का ? माझ्या अनुभवानुसार ओझर व इतर गावांच्या पाणीपुरवठा योजना हया धरणांवर आहे. परंतु एमआयाडीसी जेव्हा धरणातून उद्योगांसाठी पाणी उचल्यामुळे आम्हाला पाहिजे तेवढे पाणी मिळत नाही. त्याचा गावाच्या पाणीपुरवठयावर परिणाम होत असतो. या बाबतीत आपली नेमकी काय भूमिका असणार आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रस्तावित प्रकल्प एमआयडीसीच्या क्षेत्रात असल्यामुळे एमआयडीसीच्या करारानुसार पाणी उपलब्ध करुन देणे ही त्यांची जबाबदारी असते. सदरच्या प्रस्तावित प्रकल्पासाठी अन्य कुठुनही पाणी घेणार नाही. जलसिंचन विभागाकडून पाण्याचे पिण्यासाठी, शेतीसाठी व उद्योगांसाठी यांचेसाठी राखीव ठेवण्यात आलेले असते व त्यानुसारच पाणीपुरवठा करतात.<br>एमआयडीसीने दिलेल्या पाणीपुरवठयातूनच नियोजन केले आहे. उद्योगाच्या वाढीव प्रकल्पासाठी पाणी हे औद्योगिक पाणीपुरवठा कोठयातून देणार आहे. त्यामुळे गावाच्या पाणीपुरवठा योजनावर कोणताही परिणाम होणार नाही. |
| २७ | **श्री. किसनराव जुर्वेकर** - आपण स्वत: पाण्यासाठी नियोजन का करत नाही. सदरच्या धरणातून पाणी घेतल्यामुळे आम्हाला पाणी मिळणार नाही. | **समन्वयक** - हा प्रश्न एमआयडीसीशी निगडीत आहे. |

| | | |
|---|---|---|
| २८ | **ॲड· ठोके** - ड्राय मिलींगचा फ्लो डायग्राम सांगा ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - विद्यमान प्रकल्पामध्ये ड्राय मिलींग कार्यान्वित असल्यामुळे प्रस्तावित प्रकल्पामध्ये घेण्यात आलेले नाही. |
| २९ | **ॲड· ठोके** – ईटीपीच्या Membrane प्रक्रिया प्रणाली बद्दल माहिती सांगा ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - जेव्हा जल प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा उभारण्यात येईल तेव्हा वेगवेगळया ठिकाणी Membrane वापरले जाईल. जल प्रदूषण नियंत्रण संयंत्रणेमधील ॲक्टीव्ह कार्बन फिल्टर व आरओ मध्ये वापरला जाईल. ४० ते ५० टक्के शुध्द पाण्याचा निचरा होईल असे चांगल्या प्रतीचे Membrane बसविण्यात येतील. |
| ३० | **ॲड· ठोके** – उत्पादनातून जे काही अवशिष्ट राहतील त्यांच्याव्दारे कोणते इतर उत्पादनाची निर्मिती करण्यात येईल. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** – ड्राय ग्रन्युअल ॲण्ड वेट ग्रॅन्युअल हे घन स्वरुपातील अवशिष्ट निघणार आहे. मक्याच्या बाहेरील साळ (साल) हे वेट स्वरुपामध्ये निघणार असून कॅटल वा पोल्ट्री फीड साठी वापर करण्यात येईल. |
| ३१ | **श्री. कैलाश शेलार, चाळीसगांव** – हरितपट्टया अंतर्गत कोणत्या प्रकारची झाडे लावली जातील ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रस्तावित प्रकल्पमध्ये एकूण क्षेत्रफळापैकी ३३ टक्के जागेवर हरितपट्टा निर्माण करुन ५००० झाडे लावण्याचे नियोजन आहे. स्थानिक प्रजातीचे झाडे वन विभागाकडून घेऊन लागवड करण्यात येईल. |
| ३२ | **श्री. रुपेश भावसार, चाळीसगांव** – Membrane बदल करण्याची वांरवांरता काय असेल. ईटीपीचा दैनिक सांडपाण्याचा अहवाल आहे का तसेच खडकी ग्रामपंचायत पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीच्या अहवालामध्ये तफावत आढळल्यास जिल्हाधिकारी व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ काय कार्यवाही करणार आहे ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रत्येक Membrane बदल करण्याची वांरवांरता ही त्याच्या भार उचलण्याच्या क्षमतेवर अवलंबून असून त्याप्रमाणे त्याचे आयुष्यमान ठरविले जाते. प्रस्तावित प्रकल्पाच्या आरओ व एमईई प्रणालीतील Membrane हे सहा महिन्यांपर्यंत चालतील, असे बसविण्यात येतील. तसेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर दर सहा महिन्याला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व पर्यावरण विभाग यांना अहवाल देणे अनिवार्य आहे. OCMS बसविण्यात येऊन CPCB व MPCB सर्व्हरला जोडण्यात येईल. |
| ३३ | **ॲड· ठोके** – चिमणीची उंची किती राहणार आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - ६९ मीटर इतक्या उंचीची चिमणी उभारणार आहे. |
| ३४ | **ॲड· ठोके** - ॲप्रोच रस्ते तयार आहेत का ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - विद्यमान प्रकल्पामध्ये सिमेंटचे ॲप्रोच रस्ते कार्यान्वित आहे. प्रस्तावित ॲप्रोच रस्ते पर्यावरणाची अनुमती मिळाल्यानंतर करण्यात येतील. |
| ३५ | **श्री. रुपेश भावसार** – विद्यमान प्रकल्पाच्या पाणी, हवेचा रोजचा अहवाल कारखान्याच्या प्रदर्शनीस्थळी करायचा असतो. तर आजरोजीचा डाटा उपलब्ध आहे का ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रत्येक उद्योगाला पाणी, हवा इत्यादी गोष्टीबाबतचा अहवाल कारखान्याच्या मुख्य गेटजवळ प्रदर्शनी फलक लावणे अनिवार्य आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | प्रस्तावित प्रकल्पामध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र घेतल्यानंतर मुख्य गेटजवळ फलक लावणे बंधनकारक असून तो लावण्यात येईल. |
| ३६ | **श्री. संदिप पाटील, चाळीसगांव** - घनकचऱ्याचे व्यवस्थापन कसे राहणार आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रस्तावित प्रकल्पातून मुख्यत्वे: राख, ईटीपी स्लज, स्पेंट ऑईल इ. निघतील. राख सायलोमध्ये गोळा केली जाईल व ती विटभट्टी धारकांना व सिमेंट उद्योगांना देण्यात येईल. ईटीपी स्लज हे खत म्हणून वापरले जाईल. स्पेंट ऑईल हे अधिकृत पुर्नप्रक्रिया विक्रेत्यास देण्यात येईल. |
| ३७ | **श्री. मनोज करंकाळ, चाळीसगांव** - सदरचा प्रकल्प हा आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असल्यामुळे कुशल कामगार लागतील तर चाळीसगांव व आजूबाजूच्या परिसरातील कुशल कामगारांची भर्ती करण्यात येणार आहे का ? त्याबाबत जाहीरात व व्हॉटसअॅप माध्यमाव्दारे प्रकाशित करावे, अशी विनंती केली. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त कुशल कामगार घेऊ असे आश्वासन दिले. |
| ३८ | **अॅड ठोके** - ३३ टक्के हरितपट्टा विकसीत करणार आहे म्हणजे नेमके काय करणार आहे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रस्तावित प्रकल्पाच्या परिसराच्या आजूबाजूला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वेनुसार १० मीटर अंतरावर तीन थरांवर मोठी, मध्यम व लहान झाडे लावण्यात येतील. |
| ३९ | **श्री. रुपेश भावसार** – सदरच्या प्रस्तावित प्रकल्पाला चाळीसगांव वाशियांचा विरोध नसून विद्यमान प्रकल्पाने प्रदूषण केल्यामुळे चाळीसगांव वाशीयांचा विरोध आहे. तरी मा. जिल्हाधिकारी यांनी विद्यमान प्रकल्पाची पाहणी करुन जर अगोदरचे प्रदूषण कंपनीव्दारे व्यवस्थितरित्या नियंत्रीत केले असेल तर मगच प्रस्तावित प्रकल्पाच्या मंजूरीसाठी पुढचे पाऊल उचलावे, हि विनंती. | **प्रादेशिक अधिकारी, नाशिक** - आपले म्हणणे नोंद करुन घेतलेले आहे. परंतु सदरच्या प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपले मते, विचार, मुद्दे, नोंद विचारात घेऊन केंद्र शासनास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येतील. |
| ४० | **श्री. भूषण पाटील, चाळीसगांव** – प्रस्तावित प्रकल्पामध्ये जी काही दुर्गंधी येईल ती कमी कसे कराल यावर काही उपाययोजना करणार आहे का ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - जर एखादी गोष्ट जास्त वेळ साठवूण ठेवली तर त्यातून दुर्गंधी येत असते. तरी प्रकल्पामध्ये जो काही कच्चा माल येईल त्याचे वेळेतच वापर करावे. स्टार्च, ग्लुकोज व फ्रक्टोज व्यवस्थितरित्या साठवून अत्याधुनिक बंद स्थितीत प्रक्रिया करण्याचे प्रकल्पधारकास सांगण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच घरगुती व औद्योगिक सांडपाणी नियंत्रण संयंत्रणा, एअर ब्लोवर यांची हाताळणी व्यवस्थितरित्या करुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वानुसार चालविल्यास ६० ते ८० टक्के दुर्गंधीवर मात करता येईल. तसेच १५ ते १८ रिटंशन टाईम देऊन एअर ब्लोवर व एअर डिफयुजर चालवावे, असे मी प्रकल्पधारकास विनंती करतो. |
| ४१ | **श्री. हितेश जैन, चाळीसगांव** - सीएसआयआर भविष्यात मध्ये किती वाढणार आहे. | **श्री. चितलांगे, प्रकल्पाचे उपाध्यक्ष** - प्रकल्पाने सीएसआयआरच्या अंतर्गत वेळोवेळी मदत केलेली असून कोरोनाच्या काळात ऑक्सीजन निर्मितीचा प्रोजेक्ट चाळीसगांवच्या ट्रामा सेंटरमध्ये उभारण्यात येत आहे. तसेच पाणी अडवा पाणी जिरवा यासाठी मदत केलेली आहे. आरोग्य व शिक्षण यावर येत्या ३ ते ५ वर्षात १.५ कोटी खर्च करणार असल्याचे सांगितले. |
| ४२ | **ॲड ठोके** – व्यवसायीक आरोग्य सेवेची काय स्थिती आहे. विद्यमान प्रकल्पामध्ये असे दिसून येत नसून प्रस्तावित प्रकल्पात काही प्रक्षेपण करण्याचा प्रस्ताव आहे काय ? | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - सद्यस्थितीत विद्यमान प्रकल्पाकडे प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाना, रुग्णवाहिका व डॉक्टरर्स उपलब्ध आहेत. तरी विद्यमान प्रकल्पाचे विस्तारीकरण झाल्यास कामगार वाढतील. तरी आपली कल्पना खूपच चांगली असून नक्कीच विचार करु, याबाबत व्यवस्थापनाशी चर्चा करु असे सांगितले. |
| ४३ | **श्रीमती सुनिता मांडोळे, खडकी** - सदरच्या विद्यमान प्रकल्पातील सांडपाण्यामुळे आमच्या गावाचे पिण्याचे पाणी दुषित झाले असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. शेतकऱ्यांची जमीन नापीक होऊन खराब झाले आहे. शासनाच्या नियमानुसार अजूनही तुमचा हरितपट्टा तयार झालेला नाही. तसेच आमच्या गावातील बेरोजगार तरुण हे आपल्याकडे रोजगारच्या संधीसाठी येतात परंतु तो त्यांना तुम्ही उपलब्ध करुन देत नाही. त्यामुळे आमच्या गावात मोठया प्रमाणात बेरोजगारी निर्माण झालेला आहे. तरी याबाबत आपली नेमकी भूमिका काय असणार आहे ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - सदरच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये जल प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा हा झेडएलडीयुक्त योजने अतंर्गत उभारण्यात येणार असून तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वेनुसार चालविण्यात येईल. तरी या प्रकल्पामधून सांडपाणी हे कुठेही बाहेर सोडले जाणार नाही. विद्यमान प्रकल्पामध्ये येत्या पावसाळयापासून ३३ टक्के वृक्षलागवड करुन हरितपट्टा विकसित करणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या व वन विभागाच्या निर्देशानुसार स्थानिक प्रजातीचे वृक्ष लागवड करण्यात येईल. तसेच प्रकल्पधारकाने अगोदरच आश्वासन दिल्यानुसार सदरच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये कुशल व अकुशल कामगार हे त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार स्थानिक बेरोजगारांना प्राधान्य दिले जाईल, असे सांगितले. |

| | | |
|---|---|---|
| ४४ | **प्रा. राजेश मांडोळे, चाळीसगांव** - शासनाच्या अप्रेटिंशिप कायद्यानुसार जाहीरात देऊन भरती केली आहे का ? आपण स्थानिक अप्रेटिंशिप धारकांना न्याय दिलेला नाही. ६० ते ७० आयटीआय झालेले अप्रेटिंशिप अतंर्गत नोंदणी केलेले कुशल कामगार यांना घेण्यात आलेले नाही. | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - सदरच्या विद्यमान प्रकल्पामध्ये आयटीआय झालेले थेट भरतीव्दारे कामावर लावण्यात आलेले आहे. तसेच केंद्र सरकारच्या एनएपीएस (नॅशनल अप्रेटिंशिप प्रमोशन स्किम) मध्ये नोंदणी केलेली असून त्या अंतर्गत कुशल कामगारांना २ वर्ष प्रशिक्षण दिले जात असून पुढे त्यांना कंपनीमध्ये समाविष्ट करुन घेतले आहे. तसेच थेट कॉलेजमधून मुले सुध्दा आलेली आहेत. तसेच २७ लोक हे खडकी गावातील कामगार म्हणून घेतलेले आहे. प्रस्तावित प्रकल्पामध्ये खडकी गावातील स्थानिक लोकांना प्राधान्य देऊ असे आश्वासन दिले. |
| ४५ | **श्री. प्रविण मराठे, चाळीसगांव** - जर तुम्ही जाहीरात देऊन भरती केली असती तर हा प्रश्न उदभवलाच नसता पण तसे केली नाही जनतेची फसवणूक केली आहे. | **लोकसुनावणी सदस्य** - सदरच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये आपल्या म्हणण्यानुसार प्रकल्पधारक हे विचार करतील. |
| ४६ | **श्री. मुकेश चौधरी, चाळीसगांव** - सदरच्या प्रस्तावित प्रकल्पामुळे मक्याची आवक वाढणार आहे का ? त्याचा शेतकऱ्यांना फायदा होईल का ? थेट शेतकऱ्यांकडून माल घेण्यात यावे ही विनंती. | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - निश्चित मक्याची आवकही वाढेल व त्याचा फायदा स्थानिक शेतकऱ्यांना नक्कीच होईल. |
| ४७ | **श्री. अमोल चौधरी, चाळीसगांव** - प्रस्तावित प्रकल्पासाठी एकूण किती क्षेत्रफळ लागणार आहे व त्यापैकी किती टक्के हे हरितपट्टयासाठी असणार आहे. हरितपट्टा विकसित करण्यासाठी पाण्याचे नियोजन केले आहे का ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - प्रस्तावित प्रकल्पासाठी १५ एकर इतकी जागेची गरज लागणार असून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वेनुसार ३३ टक्के ही हरितपट्टा विकसित करण्यासाठी राखीव ठेवावी लागते. तसेच हरितपट्टा विकसित करण्यासाठी पाण्याचे नियोजन केलेले आहे. |
| ४८ | **श्री. प्रविण मराठे, चाळीसगांव** - प्रस्तावित प्रकल्पासाठी ३३ टक्के हा हरितपट्टयासाठी ठेवण्यात आल्याचे सांगितले आहे पण विद्यमान प्रकल्पामध्ये ३३ टक्के हरितपट्टयाचे काम झाले आहे का ? जर झाले नसेल तर प्रस्तावित प्रकल्पासाठी आश्वासने का देत आहे ? चाळीसगांव व खडकीतील किती टक्के महिलांना वा मुलींना घेण्यात आलेले आहे ? तुम्ही फक्त तांत्रिक भाषेतच बोलत असून आम्हाला ती भाषा कळत नसून आमच्या भाषेत समजवा. वासाबद्दल तुम्ही तर काही बोलतच नाही. आम्ही लाखो रुपयांची कर्ज घेऊन घरे बांधली आहे. | **श्री. चितलांगे, प्रकल्पाचे उपाध्यक्ष** -विद्यमान प्रकल्पामध्ये ३३ टक्के जागा राखीव ठेवली असून त्यामध्ये १०,००० इतकी झाडे लावलेली आहेत.<br>**श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - विद्यमान प्रकल्पामध्ये कोणतीही महिला वा मुली कामाला नाही. तरी गुणवत्ता नियंत्रण विभाग व लिपिक पदासाठी महिलांची गरज आहे. तरी महिला वा मुलींच्या रोजगारासाठी आपला मुद्दा नोंद करुन घेतला आहे.<br>सदरचा वास हा बेकींग स्मेल आहे. आम्ही मका हा सडवत नाही. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पापासून साधारण १ ते १.५ किमी अंतरावर रहिवाशी राहत आहेत. आम्हाला वासाचा खूप त्रास होतो. सामान्य जनतेच्या भावना या तुम्ही समजून घ्या, हि विनंती | |
| ४९ | **ॲड. ठोके** - प्रस्तावित मदर लिकर विल्हेवाटीची कसे आहे, आपले नेमके उत्पादने कोणती आहेत. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - स्टीलीज हे एमईई मध्ये प्रक्रिया करुन Consentrate करणार आहे. सदरच्या प्रस्तावित प्रकल्प हा पोर्टेबल लिकरसाठी नाही. पेट्रोलसह इथेनॉल या केंद्रीय पेट्रोलियम विभागाच्या हरित इंधन निर्मितीसाठी प्रकल्प आहे.<br>अंतिम उत्पादक - इथेनॉल |
| ५० | **श्री. प्रशांत राजपूत** – शेवटची अग्नीशामक तपासणी केव्हा झाली होती ? | **श्री. चितलांगे, प्रकल्पाचे उपाध्यक्ष** - जानेवारी २०२१, महाराष्ट्र अग्निशामक विभागाव्दारे प्रकल्पाची अग्निशामक तपासणी करुन प्रकल्पास नाहरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. |
| ५१ | **श्री. दिनेश पाटील** - सकाळीच आम्ही भूमिका स्पष्ट केलेली असून प्रामुख्याने आमचे ५ मुद्दे आहेत. खडकी ग्रामपंचायतच्या समोर जाऊन चर्चा करावी. कमिटीची स्थापना करावी. खडकी ग्रामस्थांनच्या समस्या सोडवाव्यात. तसेच सदरचा प्रकल्प हा शेतकऱ्यांशी निगडीत असल्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला जास्तीत जास्त भाव मिळावा. स्थानिकांना रोजगार मिळावा. या सर्व गोष्टी होत असतांना प्रदूषणाबाबतीत कठोर धोरण अवलंबन करुन जर प्रदूषण होऊ दिलेच नाही तर आमच्या या प्रकल्पाला विरोध राहणार नाही. तरी आमच्या प्रमुख ५ मुद्दयांचे गांभिर्येने विचार करुन सर्व उपाययोजना केल्या गेल्याा पाहिजे, अशा आमच्या भावना आहेत, असे सांगितले. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |
| ५२ | **ॲड ठोके** - जियोमेट्रीक वेल योजना आहे का ? | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - जियो मेट्रीक वेल अनिवार्य आहे. |
| ५३ | **श्री. विलास पाटील, चाळीसगांव** - स्थानिकांना प्राधान्य देण्यात यावे. | **श्री. देशमुख, पर्यावरण सल्लागार** - नक्कीच स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. |
| ५४ | **श्री. संभाजी ठोके, खडकी बु.** - खडकी गावात राहत असून माझी शेती एमआयडीसीमध्ये गेली आहे. रोजगारासाठी दोन वेळा कंपनीला भेटलो परंतु मला नाकारण्यात आले. | **श्री. चितलांगे, प्रकल्पाचे उपाध्यक्ष** - स्थानिक लोकांना नक्कीच प्राधान्य देऊ. |
| ५५ | **श्री. परमेश्वर पाटील, चाळीसगांव** - रोजगार संधी निर्मिती करावी. | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ५६ | **श्री. प्रविण मराठे, चाळीसगांव** - ठेकेदारीत पगार १५ दिवस उशीरा का करतात ? | **समन्वयक** – मुद्दयाची नोंद करण्यात आली. |
| ५७ | **श्री. गणेश पवार** - स्थानिक शेतकऱ्यांचा मका घेणार का ? | **श्री. वैभव पाटील, जनरल मॅनेजर** - हो नक्कीच घेण्यात येईल. |

श्री. सो. म. कुरमुडे, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ व श्री श्री. नितीन देशमुख, प्रकल्प प्रर्वतक यांनी सर्व सहभागी नागरिकांना आवाहन केले की अजून कुणास आपले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

श्री. सो. म. कुरमुडे यांनी नागरिकांनी मांडलेल्या सर्व मुद्द्याची नोंद घेण्यात आली असल्याचे सांगितले. त्यानंतर मा. अध्यक्ष्यांच्या परवानगीने त्यांनी सर्वांचे आभार मानून जाहीर लोकसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(सो. म. कुरमुडे)
समन्वयक
तथा
उप-प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
जळगांव

(डॉ. प्रविण जोशी)
सदस्य
तथा
प्रादेशिक अधिकारी
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नाशिक

(अभिजित राऊत) भा.प्र.से.
अध्यक्ष
तथा
जिल्हादंडाधिकारी, जळगांव